SYBA - mar - II
5/10/15

OP10AAQ

वेळ : २ तास ३० मि. गुण : ७५

प्र. १. 'कांदबरी' या साहित्य प्रकाराचे स्वरूप विशद करा. १५

किंवा

" 'कांदबरी' या साहित्य प्रकारात वास्तवतेबरोबर कल्पकतेलाही भरपूर वाव असतो,"सविस्तर चर्चा करा.

प्र. २. एक पत्रात्मक कादंबरी म्हणून 'सावित्री' कादंबरीचे वेगळेपण सविस्तर स्पष्ट करा. १५

किंवा

" प्रेमानुभव हा 'सावित्री' कांदबरीचा प्राण आहे," या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

प्र. ३. "अवकाळी पाऊस हाच खरे तर शेतकऱ्यांचा घात पाऊस आहे, या विधानाचा प्रत्यय 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतून आपल्याला येतो,"सोदहारण चर्चा करा. १५

किंवा

" लेखक आनंद विंगकर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येच्या मुळाशी जाऊन वास्तवाचा तळ गाठू पाहतात," या विधानाचा सोदहारण परामर्श घ्या.

प्र. ४. टीपा लिहा.

अ. कादंबरीतील जीवनदृष्टी. ०५

किंवा

निवेदनाचे विविध प्रकार.

ब. 'सावित्री' कादंबरीतील एजवर्थ. ०५

किंवा

'सावित्री' कादंबरीतील वेदमंत्र.

क. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' कादंबरीचा शेवट. ०५

किंवा

'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' कादंबरीतील शंकर सावकार.

************************

कृपया मागे पहा.........

O P10AA8

प्र. ५.( अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ५) १०

१. सावित्रीने आपल्या प्रियकराला किती पत्रे लिहिली आहेत?

२. सावित्रीचे वडील आप्पा कोणते पुस्तक लिहीत असतात?

३. ल्योरेला कोणते चित्र हवे असते?

४. सावित्रीचे वडील सावित्रीला कोणत्या नावाने हाक मारतात?

५. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत लेखकाने कोणत्या समस्येचा वेध घेतला आहे?

६. यशानानावर कोणाचे कर्ज असते?

७. वगळाजवळ बोकडाचे लचके कोण तोडतो?

८. यशानानाला बोकड कशासाठी विकायचा असतो?

९. उषाला कोणाशी लग्न करायचे असते?

१०. 'सावित्री' कादंबरीचा लेखनकाल किती वर्षांचा आहे?

प्र. ५.( ब ) योग्य पर्याय निवडा. ०५

१. कादंबरीच्या केंद्रस्थानी कोण असते?
अ) व्यक्ती आ) घटना इ) वातावरण

२. कादंबरीचे मूळ कशात सापडते?
अ) महाकाव्यात आ) महानाटयात इ) निबंधात

३. स्वमुखी कथन म्हणजे काय?
अ) प्रथमपुरूषी निवेदन आ) त्रयस्थ निवेदन इ) पात्रमुखी निवेदन

४. ' यमुना पर्यटन' ही कादंबरी कोणी लिहीली?
अ) बाबा पद्मनजी आ) ह. ना. आपटे इ) हरी केशवजी

५. खालीलपैकी कोणती कांदबरी भालचंद्र नेमाडे यांनी लिहीली नाही?
अ) स्वामी आ) कोसला इ) बिढार

*********************